# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3010../शि.वि./२०१६
दि. 7 /10/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :- म.न.पा. शाळेतील विद्यार्थ्यांना ''भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा'' मध्ये सहभागी करणेबाबत.**

**संदर्भ :- व्यवस्थापक, भारतीय संस्कृति ज्ञान परीक्षा, नागपूर जिल्हा गायत्री परीवार ट्रस्ट, नागपूर यांचे दि. १९.०५.२०१६चे पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, अखिल विश्व गायत्री परीवार, शांतीकुंज हरीव्दार व गायत्री परीवार ट्रस्ट, नागपूर तर्फे नागपूर जिल्हयातील शाळांकरीता भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा आयोजित केली जाते. ही परीक्षा दि. १९.११.२०१६ रोज शनिवारला होणार आहे. या परीक्षेमध्ये इयत्ता ५ वी ते ६ वीच्या विद्यार्थ्यांकरीता २०/-रू. शुल्क असून इयत्ता ७ ते १२ च्या विद्यार्थ्यांकरीता २५/-रू.शुल्क ठेवण्यात आले आहे. यामध्ये एक पाठयपुस्तक, प्रश्न पत्र, प्रमाणपत्र व पुरस्कार यांचा समावेश राहतो. ही परीक्षा ऐच्छीक असून यात परीक्षा देण्यास इच्छूक असणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी करावे. याबाबत कोणावरही सक्ती करण्यात येवू नये.

सदर परीक्षेचे आयोजन गायत्री परीवार ट्रस्ट, नागपूर करणार आहे. या परिक्षेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची फी मनपातर्फे अदा करण्यात येईल. उपरोक्त परिक्षेत सहभागी होण्यास इच्छूक विद्यार्थ्यांची यादी तयार करून आयोजकांच्या कार्यकर्त्यांना सादर करावे. त्यानुसार ते आपणांस परिक्षा पुस्तिकेचा पुरवठा करतील. आयोजकास सहकार्य करून याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी.सोबत माहितीपत्रक संलग्न आहे.

अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर व दुरध्वनी क्र.संपर्क साधावा.

श्री गायत्री शक्तीपीठ, जगनाडे चौक, नंदनवन, नागपूर - ४४०००९

कमलेश पारेख - मो. क्र. ९४२२४७६८९०
गजेंद्र सिंग - मो. क्र. ८२३७४००२९५३

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, शिक्षण समिती, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२)मा.उपायुक्त -१, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) व्यवस्थापक, भारतीय संस्कृति ज्ञान परीक्षा, नागपूर जिल्हा गायत्री परीवार ट्रस्ट, जगनाडे चौक, नंदनवन, नागपूर